प्रकरण पाचवे

# वाङ्‌मयीन मूल्यमापन

प्रकरण पाचवे

# वाङ्‌मयीन मूल्यमापन

प्रस्तुत प्रकरणात कृष्णराव भालेकरांचे जीवनचरित्र व सामाजिक कार्य यांचा अभ्यास केलेला आहे. महात्मा फुले यांनी २४ सप्टेंबर १८७३ रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. भालेकर सत्यशोधक समाजाच्या कार्यात सुरुवातीपासूनच होते. त्यांनी 'सत्यनारायण पुराणिक' व 'अज्ञानराव भोळे देशमुख' नावाचे कार्य केले. त्याचबरोबर 'हितोपदेशक भजन समाज' नावाची संस्था स्थापन केली. उपदेशपर व्याख्याने, सभा, परिषदा, दौरे आयोजित केलेले आढळतात.

कृष्णराव भालेकरांनी 'दीनबंधू' नावाचे वर्तमानपत्र सुरू केले. शेतकरी, कष्टकरी, मजूर हे पत्राचे केंद्रस्थान होते. बहुजन समाजाची जागृती व्हावी म्हणून भालेकरांनी हे पत्र सुरू केले. सत्यशोधक समाजाचा प्रसार करणे, शेतकरी, कामगार, मजूर यांची गाऱ्हाणी मांडणे हे 'दीनबंधू'चे मुख्य ध्येय होते. गणपत सखाराम पाटील यांच्या मदतीने भालेकरांनी 'दीनमित्र' नावाचे मासिक काढले. या पत्रातून भालेकरांचे लेख, रचना, श्रीखंड, पोवाडे, लावणी व 'बळीबा पाटील' नावाची कादंबरी प्रसिद्ध झाली. शूद्रातिशूद्रजनांची सुधारणा करावी या उद्देशाने 'अंबालहरी' पत्र चालू झाले. या पत्रातून प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत व्हावे यावर अधिक भर दिला आहे. भालेकरांनी या पत्राची लिखाणाची बाजू सांभाळली आहे. तसेच भालेकरांनी 'शेतकऱ्यांचा कैवारी' हे पाक्षिक सुरू केले. मागासलेल्या शेतकरी वर्गांची सुधारणा करणे हा उद्देश त्यामागे होता. या पत्रातून निवडक बातमीपत्रे, वर्तमानसार, वाचकांचा पत्रव्यवहार इ. मजकूर त्याचबरोबर भालेकरांचे 'राज्यशकट' नावाचे चित्र प्रसिद्ध झाले. सत्यशोधक समजाचा प्रसार करणारे 'राघवभूषण' नावाचे साप्ताहिक होते. या पत्रातून भालेकरांना पोलिसांनी पकडून पुराव्याची मागणी केली होती. या पुराव्याचे उत्तर देण्यासाठी भालेकरांनी 'राघवभूषण' या पत्राचा उपयोग केला आहे. याचा विस्ताराने प्रस्तुत प्रकरणात आढावा घेतला आहे.

कृष्णराव भालेकरांनी 'सुशिक्षण गृह' सुरू केले. खेडोपाडी शेतकऱ्यांची मुले अनेक कारणांमुळे शाळेत जात नव्हती. ती शिकून शहाणी व्हावीत यासाठी पुणे पेठ कसबा येथे 'सुशिक्षणगृह' स्थापन केले. त्याचबरोबर व्यापार किंवा नोकरी करणाऱ्यांना पाटील, देशमुख, इमानदार या लोकांना आपल्या मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष देता येत नव्हते. या जाणिवेतून भालेकरांनी 'सुशिक्षणगृह' सुरू केले. भालेकरांनी मागासवर्गीय व अशिक्षित लोकांच्या हितासाठी 'दीनबंधू सार्वजनिक सभा' स्थापन केली. या सभेमध्ये प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्याबाबत भर दिला आहे. यासाठी सरकारकडे ठराव पास केला होता. राजकीय कामे करण्याचे श्रेय भालेकरांना दिले जाते.

याशिवाय भालेकरांनी 'दीनबंधू फ्री स्कूल' सुरू केले. बहुजन समाजातील अज्ञानी, अशिक्षित लोकांच्या मुला-मुलींना शिक्षण मिळावे म्हणून भालेकरांनी 'फ्री स्कूल' सुरू केले. अलाहाबाद येथे राष्ट्रीय अधिवेशनाच्यावेळी एक सभा घेतली. या सभेत भालेकर यांच्याबरोबर डॉ. भांडारकर, न्या. रानडे यांचा मिरवणुकीत सहभाग होता. या प्रचारतंत्रासाठी मिरवणुका, मेळावे, सत्कार, समारंभ आयोजित केले होते. तसेच 'चित्रे' या प्रभावी साधनांचा समाजजागृतीसाठी वापर केला आहे. 'राघू गाडीवान', 'शेतकऱ्यांचा देखावा', 'गावगाडा' व 'व्याजाचा उंट' अशी चित्रे प्रसिद्ध करून शेतकऱ्यांच्या करुण कहाणीचे दर्शन या चित्रातून घडविले आहे.

याबरोबरच कृष्णराव भालेकरांनी 'पंचखेळा'ची निर्मिती केली आहे. बहुजन समाजाची उन्नती व्हावी हा त्या खेळामागे उद्देश होता. हा खेळ विशेषत: अज्ञानी वर्गातील मुलांच्यासाठी खेळता यावा यासाठी हा वाङ्मयीन खेळ शोधून काढला आहे.

दुसऱ्या प्रकरणात कृष्णराव भालेकरांच्या पद्य साहित्याचा अभ्यास केलेला आहे. मध्ययुगीन मराठी साहित्याशी अतूट नाते सांगणारी भालेकरांची कविता आहे. यामध्ये पोवाडे, अभंग, लावणी, पदे, श्रीखंड व स्फुट काव्यरचना असे विविध काव्यप्रकार भालेकरांनी हाताळले आहेत. या साहित्यामध्ये 'पोवाडे', 'हितोपदेश', 'शेतकऱ्यांचे मधुर गायन', 'भालेकरकृत उपदेशपर लावणी', 'श्रीखंड' व 'कलियुगाचे भय' या रचनांचा

समावेश होतो. या काव्यरचनेतून ग्रामीण जीवन यथार्थपणे मांडण्याचा उद्देश आहे. शेतकरी, कष्टकरी, जनतेची सुखदु:खे मांडली आहेत. याचा प्रस्तुत प्रकरणात शोध घेतला आहे.

कृष्णराव भालेकरांनी एकूण सात पोवाडे लिहिले आहेत. 'आमचे कारागीर' या पोवाड्यातून भारतीय कारागिरांच्या विपन्नावस्थेचे चित्रण केले आहे. भालेकरांनी आपल्या देशाच्या दयनीय अवस्थेचे वर्णन 'पूर्वीची व सांप्रतची स्थिती या पोवाड्यातून केले अहे. 'कलगीतुरा', 'शिवशक्ती', द्वैताद्वैत वगैरे विषयांवर वादविवाद करणारांस विनंती'. या पोवाड्यातून वाचाळ, निरर्थक बडबड करणाऱ्यास भालेकरांनी विनंती केली आहे. शेतकऱ्यांना वेठीस धरण्याच्या पद्धतीमुळे त्यांच्यावर ओढवणाऱ्या दु:खाचे चित्रण 'राघू गाडीवाना'चा पोवाडा यामधून केले आहे. दक्षिण महाराष्ट्रामध्ये पुणे, सातारा, नगर, कलादगी, सोलापूर या जिल्ह्यात दुष्काळाने कहरच केला होता. या दुष्काळाचे प्रलंयकारी चित्रण 'दक्षिणेतील सन १८७७ चा भयंकर दुष्काळ' या पोवाड्यातून केले. 'अनार्थांचे गाऱ्हाणे' हा भालेकरांचा पोवाडा आहे. मानवी हक्कांचे मागणे मागण्यासाठी या पोवाड्याची निर्मिती केली आहे. तत्कालीन समाजस्थितीचे वर्णन करणारे भालेकरांचे पोवाडे आहेत. याचा विस्ताराने प्रस्तुत प्रकरणात आढावा घेतला आहे.

मध्ययुगीन साहित्यातील 'अभंग' हा रचना प्रकार आहे. कृष्णराव भालेकरांनी 'हितोपदेश' नावाची अभंग रचना इ. स. १८७६ साली केली. यामध्ये एकूण १६ अभंग व हिंदी पदे आहेत. अभंगातून शूद्रांच्यावर होणारे अन्याय, अत्याचार, धार्मिक-आर्थिक शोषण, सामाजिक विषमता, जातिभेद, दैव, देवभोळेपणा, अज्ञान, निरक्षरता या परिणामांना सामोरे जाण्यासाठी भालेकरांनी विद्येची महती पटवून सांगितली आहे. 'पाटील-कुलकर्णी', ' शेटजी-भटजी', 'सावकार -सरकार' हे त्यांच्या चिंतनाचे विषय आहेत. या अभंगातून शेतकऱ्यांच्या दु:खाची कारणमीमांसा भालेकरांनी केली आहे. सत्यस्थितीचे हृदयभेदक चित्रण केले आहे. या दास्यत्वापासून मुक्ती मिळावी यासाठी 'विद्या शिका' असा उपदेश केला आहे. भालेकरांनी संधीसाधू पुरोहित वर्गाचे पितळ उघडे पाडले आहे. अभंगाची भाषा अत्यंत सोपी आहे.

'शेतकऱ्यांचे मधुर गायन' हा भालेकरांचा काव्यसंग्रह ग्रामीण जीवनाचे वास्तव दर्शन घडविणारा आहे. यामध्ये एकूण ३२ पदे आहेत. या कवितेतून शेतकरी जीवनाचा सर्वांगिण विचार व्यक्त केला आहे. शेतकऱ्यांचे कष्टप्रद जिणे, त्यांची फसवणूक व पिळवणूक करणारे घटक, रात्रंदिवस शेतात राबूनही अन्न-वस्त्र मिळत नाही. या उलट शेटजी, भटजी, कुलकर्णी यांची जीवन जगण्याची पद्धत, यातील  विसंगती फरक भालेकरांनी कवितेतून व्यक्त केला आहे. शेतकरी देशाचे पोषक, बळीराजाचे वंशज आहेत. काबाडकष्ट करूनही त्यांच्या नशिबाला अठरा विश्वे दारिद्र्यच येते. अज्ञानी शेतकऱ्याला विद्या नसल्यामुळे त्यांची फसवणूक केली जाते. त्याचबरोबर 'खोटे गुरु', 'मुहूर्त', 'सोवळ्या-ओवळ्यातील फोलपणा स्पष्ट केला आहे. यातून मुक्तता करण्यासाठी 'विद्या' शिकण्याचा मार्ग सुचविला आहे. शेती,शेतकरी, शेतकऱ्यांची मुले, शेतकरणी, शेतकरणी वीर-अंगना यांचा गौरव केला आहे.

भालेकरांची ही कविता अतिशय हृदयस्पर्शी आहे. ग्रामीण जनतेशी या कवितेचे अगदी जवळचे नाते आहे. भालेकरांनी शेतकऱ्यांच्या दु:खस्थितीचे निरीक्षण व वर्णन यथार्थपणे केले आहे.

कृष्णराव भालेकरांनी लोकशिक्षणासाठी लावणीचा वापर केला आहे. 'पाटील-कुळकर्णी' या लावणीतून तत्कालीन कार्य करण्याच्या पद्धतीवर प्रकाश टाकला आहे. 'मुहूर्त' या कवितेतून अंधश्रद्धांचे दर्शन घडविले आह. तर 'राजाचा दरबार', 'कुलकर्णी पट्टा' यामधून तत्कालीन कारभार कसा चालत असे यावर विदारक प्रकाश टाकला आहे. तर 'दारूबाज' या कवितेतून व्यसनाच्या आहारी गेलेल्या व्यक्तीच्या कुटुंबाची वाताहत कशी होते हे स्पष्ट केले आहे. हे भालेकरांनी साध्या, सरळ व सोप्या भाषेतून व्यक्त केले आहे.

कृष्णराव भालेकरांनी आपल्या रचनेस 'श्रीखंड' हे नाव दिले आहे. या रचनेत एकूण पाच पदे आहेत. नीतीमत्तेने वागणे, व्यसनापासून दूर राहणे, आपल्या मुलांना शाळेत घालणे, जातीय विषमता नष्ट करणे हे संदेश दिले आहेत. निरनिराळी तुलनात्मक उदाहरणे देऊन

भालेकरांनी आपले विचार व्यक्त केले आहेत. त्यामुळे ही काव्यरचना अधिक लक्षणीय ठरली आहे.

'कलियुगाचे भय' ही भालेकरांची स्फुट काव्यरचना आहे. यामध्ये सत्ययुगातील देवतांची चिकित्सा केली आहे. परंपरागत चालीरिती, रुढी, परंपरा, आचार-विचार यावर भालेकरांनी कठोर प्रहार केला आहे. या रचनेत परखडपणा व उपहास जाणवतो. ही काव्यरचना प्रबोधनपर आहे. छोट्या-मोठ्या गोष्टींची चिकित्सा करून त्या समाजासमोर आणल्या आहेत.

काही ठिकाणी विषयांमध्ये एकसारखेपणा आढळतो. पण भालेकरांनी मनोरंजनासाठी काव्यरचना केली नाही. त्यांची कविता समाज प्रबोधनासाठी आहे. त्यामुळे समाज वास्तव मांडून ते शेतकरी,कष्टकरी जनतेच्या दारिद्र्याची कारणमीमांसा करतात. पिढ्यान्‌पिढ्या शेतकरी, कष्टकरी, जनतेच्या मनावर ठाण मांडून बसलेल्या धार्मिक समजुतींना आव्हान केले आहे. त्यातील फोलपणा नजरेस आणणे भालेकरांना गरजेचे वाटते. त्यामुळे तेच विषय पुन: पुन्हा या लेखनात आलेले आढळतात.

कृष्णराव भालेकरांनी समाजाला प्रचलित असणारे पोवाडे, लावणी, अभंग या काव्यप्रकाराचा अवलंब करून तत्कालीन समाजस्थितीचे चित्रण केले आहे. शेतकरी, कष्टकऱ्यांची दु:खे, अन्याय स्पष्ट केला आहे. त्यांच्या दु:खाची कारणमीमांसा केली आहे. तसेच 'विद्या' घेण्याचा संदेश दिला आहे. भाषा साधी, सोपी हृदयाला भिडणारी आहे. यामधून समाजस्थितीचे दर्शन घडविले आहे.

तिसऱ्या प्रकरणात कृष्णराव भालेकरांच्या 'बळीबा पाटील' या कादंबरीचा विचार केलेला आहे. 'बळीबा पाटील' ही भालेकरांची प्रसिद्ध कादंबरी आहे. ही कादंबरी 'दीनमित्र' अंकामधून एप्रिल १८८८ ते जुलै १८८८ या काळात क्रमश: प्रसिद्ध झाली. या कादंबरीचे मूळ शीर्षक 'बळीबा पाटील आणि १८७७ चा दुष्काळ' असे आहे. पण या कादंबरीत दुष्काळाचे वर्णन आलेले नाही. ही कादंबरी एकूण चार भागात विभागली आहे. कादंबरीच्या प्रस्तावनेत कादंबरीची निर्मिती व प्रेरणा स्पष्ट झाली आहे. 'शेतकऱ्यांस

सहजरित्या मार्ग सुचून आपली सुधारणा करता यावी' हा हेतू नजरेसमोर ठेवून भालेकरांनी लेखन केले आहे. शेतकऱ्यांच्या दु:खाला 'अज्ञान' व 'दारिद्र्य' हे घटक कारणीभूत आहेत. या गुलामगिरीतून शेतकऱ्यांची सुटका करण्यासाठी व 'शेतकऱ्यांस शहाणे' करणे हा उपाय सुचविला आहे. या कादंबरीतून शेतकरी जीवनाचे दर्शन घडविले जाते.

या कादंबरीचे स्वरूप रूपकात्मक आहे. एकूण चार भागात विभागलेल्या कादंबरीची रचनाही वैशिष्ट्यपूर्ण आहे. या कादंबरीची प्रत्यक्ष सुरुवात बळीबा पाटीलच्या प्राचीन इतिहासाने झाली आहे. नंतर कुटाळ गावाची रचना, शेती करण्याची पद्धत, पिके, आहार, राहणीमान, पोशाख, चालीरिती, सण, पाटील-कुलकर्णी संघर्ष इ. व्यवहार प्रकट होतो. दुसऱ्या भागात बळीबाच्या आदर्श पाटीलकीचे वर्णन केले आहे. त्याच्या कुटुंबाचा परिचय करून दिला आहे. तिसऱ्या भागात बळीबाने सर्व आप्तमंडळी बोलवून धर्म, जात, ईश्वर याविषयी चर्चा केली. तर चौथ्या भागात बळीबाने आपल्या जीवनाचे सार्थक कसे करावे? या संदर्भाने उपदेशपर विवेचन आले आहे. या सभेत प्रत्येकाला आपली मते व्यक्त करण्याची संधी दिली आहे.

या कादंबरीला फारसे कथानक नाही. 'बळीबा पाटील' ही कादंबरीची प्रमुख व्यक्तिरेखा आहे. रावसाहेब, दौलतराव, मैनाबाई, बाळासाहेब, सईबाई या कादंबरीतील दुय्यम व्यक्तिरेखा आहेत. तर इतर गौण व्यक्तिरेखेमध्ये खंडुजीबुवा, म्हसाजी, अनाजीबुवा, कुसाजी, धारराव, म्हाळसाबाई, दत्तु महार, राम्यागडी, पुराणिक, रुपचंद मारवाडी, धोंडूबाई, गोजराबाई, चिमणाबाई इ. व्यक्तिरेखा रेखाटल्या आहेत. रावसाहेब, दौलतराव, मैनाबाई, बाळासाहेब या व्यक्तिरेखा भालेकरांच्या विचारांचे प्रतिनिधीत्व करणारी आहेत. इतर मुले परंपरावादी आहेत. त्याची पत्नी 'सईबाई' पुरोगामी विचारसरणीची आहेत. एकूण २२ व्यक्तिरेखा आहेत. तत्कालीन समाजाचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या विविध वृत्ती-प्रवृत्तीचे दर्शन घडविणाऱ्या आहेत. मानवी जीवनाविषयी गंभीर स्वरूपाचे मूल्यात्मक चिंतन केले आहे. विशिष्ट तत्व व मूल्यदृष्टी डोळ्यासमोर ठेवून भालेकरांनी लेखन केले आहे. चर्चात्मक कादंबरी लिहिणारे भालेकर हे पहिले लेखक ठरतात.

या कादंबरीचा आशय व विषय पूर्णत: वेगळा आहे. खेडेगाव, तेथील लोकांचे जीवन, शेती, शेतकरी, त्याचे कष्ट दारिद्र्य, पाटील-कुलकर्णी असे ग्रामजीवनाचे विविधांगी चित्रण या कादंबरीतून केले आहे. त्याचबरोबर धर्म म्हणजे काय? जाती कोणी तयार केल्या? जीवनसार्थक होण्यासाठी काय करावे? इ. गोष्टींची चर्चा केली आहे. जीवन सार्थकतेसाठी प्रचलित मार्ग ब्राह्मण भोजन, तीर्थयात्रा व पुराण कथा इ. गोष्टींची चिकित्सा केली आहे. उदा. कुंभकर्ण या शिवाय स्त्रियांचे प्रश्न मांडले आहेत. या सर्वांवर महात्मा फुले यांच्या विचारांचा प्रभाव जाणवतो.

एकूण कादंबरीचा विचार करता कादंबरीची भाषा देशी निवेदन शैलीतून आकारास आली आहे. भालेकरांची भाषा रांगडी असली तरी तत्कालीन जनसामान्यांची बोली आहे. सामाजिकता व प्रबोधनात्मकता हे कादंबरीचे गुण आहेत. ही कादंबरी संवादात्मक आहे. संवाद मोजके व आटोपशीर आहेत. प्रसंगी म्हणी, वाक्प्रचार, जोडशब्द इत्यादींचा वापर केला आहे.

चौथ्या प्रकरणामध्ये कृष्णराव भालेकर यांच्या वैचारिक गद्याचा अभ्यास केलेला आहे. यामध्ये वैचारिक ग्रंथ, निबंध व भाषणे यांचा समावेश होतो. भालेकरांनी 'शास्त्राधार' व 'निराश्रित हिंदु व ब्राह्मण क्षत्रिय' हे दोन वैचारिक ग्रंथ लिहिले आहेत. 'शंकराचार्य काय करून असतात?', 'तेलगू तरुणास उद्देशून' व 'ब्राह्मणांवर रागावण्याची कारणे' हे निबंध आहेत. 'कारखाने आणि व्यापार चालविणारी शेतकरी मंडळी' व 'शेतकऱ्यांनो डोळे उघडा' या दोन भाषणांचा समावेश केला आहे.

कृष्णराव भालेकरांनी 'शास्त्राधार' नावाचे छोटे संवादात्मक पुस्तक इ. स. १९०८ मध्ये लिहिले. प्रश्नोत्तरात्मक संवाद पद्धतीचा वापर केला आहे. बाळंभटजीने घेतलेले आक्षेप व यशवंतरावांनी दिलेली उत्तरे यामधून त्या काळात सत्यशोधक चळवळीवर कोणते आरोप केले जात होते. याचेही दर्शन घडते. हे आरोप कसे निराधार आहेत ही उदाहरणे देऊन भालेकरांनी स्पष्ट केले आहे. वैचारिक पातळीवरून लिहिलेल्या चटकदार संवादातून

पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेल्या रुढी-परंपरा, रीतीरिवाज यातील फोलपणा विविध उदाहरणाद्वारे पटवून दिला आहे.

भालेकरांनी 'निराश्रित हिंदु आणि ब्राह्मण क्षत्रिय' हे पुस्तक इ. स. १९०२ मध्ये लिहिले. भारतीय समाजव्यवस्था ही चातुर्वर्ण्यावर आधारलेली आहे. या चातुर्वण्यात ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र यांचा समावेश केला आहे. ब्राह्मण व क्षत्रिय हे हिंदू लोकांचे पुढारी आहेत. वैश्य व शूद्र 'निराश्रित हिंदू' होय. या निराश्रितांना मानवी अधिकाराची जाणीव करून देऊन ब्राह्मण क्षत्रियांनी कोणत्या मार्गाने उतराई झाले पाहिजे. याबाबत विचार मांडले आहेत. त्याचबरोबर राजे लोकांच्या ऐषआरामावर प्रकाश टाकला आहे. 'शंकराचार्य काय करून असतात?' यामधून मार्मिक सवाल विचारून शंकराचार्यांविरूद्ध भालेकरांनी तक्रार केली आहे. तर 'तेलगू तरुणास उद्देशून' यामधून अनाथपणा वाढविणाऱ्या 'अनाथफंड संस्था' स्थापण्याऐवजी अज्ञानपणा घालविणारे शिक्षण सर्वांना दिले पाहिजे. असा उपदेश तेलगू तरुणांना केला आहे. 'ब्राह्मणांवर रागावण्याची कारणे' या निबंधातून ब्राह्मणांनी आपला स्वार्थ साधण्यासाठी बहुजन समाजास अज्ञानी ठेवले आहे. या दयनीय अवस्थेस ब्राह्मण जबाबदार आहेत. ही वस्तुस्थिती उघड करून दाखविली आहे. आपले विचार निर्भिड व परखडपणे ठोस पुराव्यासहित मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

'भाषणे' या प्रभावी माध्यमांचा कृष्णराव भालेकरांनी उपयोग केला आहे. शेतकऱ्यांच्या दु:खाला वाचा फोडण्याचे कार्य भालेकरांनी केले आहे. इ. स. १९०३ मध्ये 'कारखाने आणि व्यापार चालविणारी शेतकरी मंडळी' व 'शेतकऱ्यांनो डोळे उघडा' या भाषणातून अनुक्रमे कंपनीसंबंधी व शेतकऱ्यांची दु:खस्थिती या विषयीचे कारणे, परिणाम व उपाय सुचविले आहेत.

'कारखाने आणि व्यापार चालविणारी शेतकरी मंडळी' व 'शेतकऱ्यांनो डोळे उघडा' ही दोन भाषणे उपलब्ध आहेत. शेतकऱ्यांच्या दु:खाची कारणे सांगून त्याचे परिणाम व त्यावर उपाय सुचविले आहेत. शेतकऱ्यांच्या स्थितीला कारणीभूत असणारे घटक म्हणजे 'अज्ञान' व 'दारिद्र्य' होय. या भयानक रोगाने शेतकऱ्यांना पछाडले आहे. शेतकऱ्यांची

वाईट स्थिती दूर करण्यासाठी त्यावर 'विद्या आणि उद्योग' हे उपाय सुचविले आहेत. यासाठी शेतकऱ्यांना प्रत्येक गावी शाळा काढून उद्योगधंद्याचे शिक्षण दिले पाहिजे. त्याचबरोबर सर्व शेतकऱ्यांनी एकत्र येऊन कंपनी स्थापन करावी, असा भालेकरांनी उपदेश केला आहे. अशाप्रकारे भालेकरांनी शेतकऱ्यांच्या उणिवा सांगून त्यांच्या दु:स्थितीची कारणमीमांसा केली आहे.

'शेतकऱ्यांनो डोळे उघडा' हे भालेकरांचे प्रसिद्ध भाषण आहे. या भाषणातून शिक्षणाचे महत्त्व स्पष्ट करतात. इंग्रजी राज्यात शिक्षणाची संधी होती. पण रामराज्यात सर्वांना शिक्षण उपलब्ध नव्हते. म्हणून भालेकरांनी रामराज्याची चिकीत्सा केली आहे. शबुंक वधाच्या कथेवर भालेकरांनी टीका केली आहे. 'विद्येचे पाय' व 'उद्योगाचे हात' नसल्यामुळे शेतकऱ्यांची अशी दुरावस्था झाली आहे. हे भालेकरांनी विविध उदाहरणांद्वारे पटवून दिले आहे. भालेकरांच्या भाषणातून उपरोध, उपहास, परखडपणा व निर्भिडता स्पष्ट होते.

भालेकरांच्या एकूण गद्यपद्य शैलीचा विचार करता असे लक्षात येते की, गद्यामध्ये पोवाड्याची भाषा, साधी, सोपी व सुबोध आहे. सामान्य माणूस श्रोता म्हणून नजरेसमोर ठेवून भालेकरांनी रचना केली आहे. त्यामुळे त्यांच्या पोवाड्यातून जनसामान्यांबद्दल जिव्हाळा, अपार माया, कारुण्य, आपुलकी या गुणांमुळे पोवाडा ओतप्रेत भरलेला आहे. त्याचबरोबर करुण रसाचा उत्कट आविष्कार केला आहे. उपदेश, सडेतोडपणा, प्रासादत्मकता ही भालेकरांच्या लेखनीचे वैशिष्ट्ये आहेत. शेतकरी, कष्टकरी, मजूर यांची दु:खे अतिशय समर्पकपणे मांडली आहेत. त्यामुळे या पोवाड्यांना वाङ्मयीन मूल्य प्राप्त झाले आहे. पोवाड्याचे निवेदन प्रवाही आहे. येथे अलंकारिक भाषेचा वापर केला नाही. याबरोबरच बहुजन समाजाची अगतिकता, प्रकोप, आवेश, आक्रमकता, प्रचारकीपणा, तळागाळातील वर्गाच्या मानवी संवेदना त्यांच्या जीवनाचा सखोल आशय ही पोवाड्यांची वैशिष्ट्ये होत.

अभंगाची भाषा साधी, सोपी, सरळ आहे. देशी रचनाबंधाचा वापर केला आहे. संतांनी पारमार्थिक विचार मांडले. तर भालेकरांनी सामाजिक अन्यायाला वाचा फोडण्यासाठी अभंगाचा वापर केला आहे. बहुजन समाजाला मार्गदर्शन करण्यासाठी समाजातील दंभ, ढोंगावर कोरडे ओढले आहेत. भालेकरांनी हा निवडलेला प्रकार प्राचीन साहित्यातील असला तरी त्याचा आशय मात्र आधुनिक आहे. अज्ञान, अंधश्रद्धा, समाजातील वर्णव्यवस्था तत्वज्ञान भरुन लोकांना अज्ञानी पिंजऱ्यात बंद करून ठेवले आहे. शेतकऱ्यांच्या दैन्य दु:खाची कारणमीमांसा केली आहे.

'शेतकऱ्यांचे मुधुर गायन' ही भालेकरांची हृदयस्पर्शी कविता आहे. खेड्यापाड्यातील लोकांशी अगदी जवळचे नाते सांगणारी आहे. शेतकऱ्यांच्या दु:खस्थितीचे निरीक्षण भालेकरांनी यथार्थपणे केले आहे. मोजक्या शब्दांत वर्णन केले आहे. यामध्ये स्पष्टपणा व निर्भिडता हे काव्यगुण स्पष्ट होतात. त्यांची भाषा साधी, सोपी, गेय आहे. तत्कालीन समाजस्थितीचे दर्शन घडविले आहे. भालेकरांच्या रचनेतून उपहास व परखडपणा जाणवतो. समाज जीवनाचे दर्शन व प्रबोधन घडविण्यासाठी भालेकरांनी काही ठिकाणी कठोर भाषाही वापरली आहे.

कृष्णराव भालेकरांची लेखनशैली तत्कालीन शैलीपेक्षा वेगळीच आहे. त्यांची वर्णनशैली, संवादात्मकता प्रसंगी येणारा उपहास, उपरोध, परखडपणा, निर्भिडपणा हे त्यांच्या लेखनशैलीची वैशिष्ट्ये आहेत. एखादा येणारा प्रसंग शैलीदार पद्धतीने परिणामकारक करण्याची हातोटी भालेकरांनाच साधली आहे. भालेकरांचे विचार उदात्त व शाश्वत मानवी मूल्यांनी भरलेले आहेत. जोश, आवेश, धारदारपणा, सोपेपणा थोडक्या शब्दांत आपला मुद्दा प्रभावीपणे मांडणे, त्याबरोबर दुसऱ्यांच्या मुद्यांवर अचूक प्रहार करणे हे सर्व गुण त्यांच्या लेखनशैलीचे आढळतात. श्रोत्यांना आपल्या कळकळीने आपलेसे करून घेणे, त्यांना मधूनमधून साद घालणे, त्यांना पटतील अशी समर्पक उदाहरणे देणे या गोष्टींमुळे भालेकरांचे वक्तृत्व सर्वांनाच प्रभावी वाटत असे. समर्पक म्हणी, दाखले, अभंग, व्यवहारी

जीवनातील उदाहरणे देऊन भालेकरांनी जनसामान्यांशी सुसंवाद साधला आहे हे त्यांच्या लेखनशैलीवरून स्पष्ट होते.

**सारांश :**

कृष्णराव भालेकर धडाडीचे कार्यकर्ते, प्रतिभासंपन्न लेखक, कवी व पत्रकार होते. त्यांनी समाज जागृतीसाठी वैचारिक व ललित स्वरूपाचे लेखन केले. प्रस्तुत लघुप्रबंधात त्यांच्या लेखनाचा वाङ्‌मयीन अभ्यास केलेला आहे.